
|| श्री गजानन प्रसन्न ||
|| श्री केशवराज प्रसन्न ||

Book Packet Containing
Periodical

R.N.I. No. : MAHMAR/2000/4869

## आपली आहे प्रगतीची

# वाटचाल



* वर्ष १६ वे, अंक १ * दि. १५ मार्च २०१६ * किंमत रु. २०/-



नाशिक येथे झालेल्या आपल्या मंडळाच्या कार्यकारिणीच्या सभेचे यजमानपद श्री. सुनिल देवधर यांनी स्वीकारले होते.
उभयतांचे उपाध्यक्ष श्री. सुरेश देवधर यांनी आभार मानले



नाशिक येथील तीळगूळ संमेलन









## वार्षिक स्नेहसंमेलन
## जानेवारी २०१६














डोंबिवली येथील कुलबंधु-भगिनींनी
आसुद येथे छोटीशी सहल
आयोजित केली होती.



पुणे येथील तीळगूळ संमेलन





संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक श्री. वा. ना. देवधर यांचेसाठी आतिथी संपादक श्री. आशिष देवधर यांनी साधना ऑफसेट, भारताचार्य वैद्य चौक, कल्याण येथे छापून, वैद्य वाडा, टिळक चौक, कल्याण (प.) ४२१३०१ येथे प्रसिद्ध केले.

# अध्यक्षीय मनोगत

*कोणालाही विचारले की, ''तुला बंधने आवडतील की मुक्तता?'' तो झटकन 'मुक्तता' हेच उत्तर देईल. पण हा अविचार ठरेल. काही बंधने आपण स्वत:हून स्वीकारतो. उदाहरणार्थ विवाहबंधन. मैत्रीचे स्नेहबंध. घरातील आईवडील, भाऊबहीण ह्यांचे प्रेमबंध वगैरे. हे बंध कधीच सुटू/ तुटू नयेत असेच वाटते. या उलट एकटा सडाफटिंग, ज्याला कोणीच नातेवाईक नाहीत, तो त्यासाठी आसूसलेला असतो. आपले सुख-दु:ख कोणालातरी सांगावे अशी तीव्र इच्छा त्याला असते.*

*कल्पना करा, पतंग हवेत छान उडत असतो, डुलत असतो; परंतु त्याला असे वाटले की हा धागा मला नीट उडूच देत नाही, मला खाली खेचून धरतो. असा विचार करताना, 'हा धागाच नसेल तर आपले काय होईल' हा विचारच तो करत नाही. इतक्यात त्याचा धागा दुसऱ्या पतंगाच्या धाग्याने कापला व बंधमुक्त होण्याचा परिणाम त्या पतंगाला लगेचच कळला, जमिनीवर आल्यावर.*

*आपण आपल्या घराचा मुख्य दरवाजा बंद करून घरात राहतो. त्या दारास बाहेरून दोन-तीन कड्या असतात. कधीकधी कुलपेही असतात. पण आपणास आपण बंधनात आहोत असे वाटते का? उलट बंदिगृहास फक्त बाहेरून एक कडी व एक कुलूप असते. पण कोणालाही त्यातून स्वत:चे इच्छेप्रमाणे बाहेर पडता येत नाही, म्हणून ते बंधन.*

*सहजीवन (Live in Relation) मध्ये स्त्री व पुरुष एकत्र राहात असतात. त्यांत बंधन नसते. बंधन नसल्याने जबाबदारी नाही. सुरुवातीस हे ठीक वाटते. पण जर प्रेम उत्पन्न झाले तर, अधिकार असावा असे वाटते. आपले प्रेम फक्त आपलेच असावे असे वाटते म्हणजेच बंधन आले.*

*समाजास समाजाचे बंधन असते. स्वच्छता राखणे, ध्वनी प्रदूषण न करणे, दुसऱ्यास कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही असे वागणे, समाजाचे नियम पाळणे, वगैरे. ही बंधनेच होत. उलट रानावनात कोणतेही बंधन नसते, पण बळी तो कान पिळी हाच नियम. गरज व भूक भागविण्यास जो शक्तिवान तोच राज्य करणार. बंधन नाही पण सतत भय व चिंता. कुत्रा, घोडा, वगैरे पाळीव प्राणी हे बंधनात असतात. पण त्यांना ते आवडते. त्यांना मुक्त केले तरी ते मालकाकडे परत येतात.*

*सिने कलाकार हे मुक्त असतात पण त्यांच्या प्रसिद्धीमुळे त्यांना बंधने येतात. लोकांच्या नजरा हेच त्यांना बंधन होते. कल्पना करा एखादा सिने कलाकार, नटी चौपाटीवर पाणीपुरी खात आहेत किंवा एखाद्या रस्त्यावरून फिरण्यास बाहेर पडले आहेत. एवढे लोक त्यांना घेरतील की त्यांना त्यांचे स्वातंत्र्य अनुभवता येणार नाही.*

*पैसा कायम बंधनात असतो, सेफमध्ये, कपाटात, लॉकरमध्ये वगैरे. खुला ठेवला, हातात खुले लाखो रूपये घेऊन आपण फिरू शकणार नाही. लक्ष्मी चंचल असते. तिचा उपभोग वापरून किंवा दान करुनच.*

*एवढे कशाला, आपली पृथ्वी व सर्व ग्रहमालिका सूर्याच्या परिक्रमेत बांधलेले आहेत व आपली सौर मालिका विश्वात बांधली आहे. हे बंधन सुटले की कृष्ण विवरांत नष्ट होणे आलेच. आपण स्वत: गुरुत्वाकर्षणाचे बंधनाने पृथ्वीवर टिकून आहोत. त्या बंधनाबाहेर आपले अस्तित्व असू शकत नाही. रोजच्या व्यवहारात पाहा. नाडी, बटणे, हुक, लग्नगाठ, कड्याकुलपे नष्ट झाल्यास काय होईल?*

*जवाहरलाल नेहरू विद्यापीठांतील विद्यार्थ्यांना भाषणस्वातंत्र दिल्याचा दुरुपयोग होऊ शकतो हे आपण पाहिले आहे.*

**– पुरुषोत्तम गो. देवधर**
अध्यक्ष, देवधर मंडळ

# देवधर मंडळ कार्यकारिणी (१/४/२०१३ ते ३१/३/२०१६)

**अध्यक्ष**
**पुरुषोत्तम गोपाळ देवधर** (कु. वृ. पान. ३६०)
ब्लॉक नं. २, भागीरथी टॉवर्स, स.नं. ६, हि. नं. ११,
कोकण एक्सप्रेस, हॉटेल लेन, कोथरुड पुणे-४११०३८
दूरध्वनी- ९८६०३०६३४४, ०२०/२५४५६७५०
e-mail : pgdeodhar@gmail.com

**उपाध्यक्ष**
**वासुदेव नारायण देवधर** (कु. वृ. पान. ४९७)
सी-३/१०२, सॅटेलाईट क्लासिक, जुने सी. एस. सी. कंपाऊंड,
गुंफा रोड, जोगेश्वरी (पूर्व) मुंबई-४०००६०
दूरध्वनी २८२६१०२८,२८२४६०४२

**सुरेश विश्वनाथ देवधर** (कु. वृ. पान. २१)
१०२, आय् विंग, प्रणयनगर, राम मंदिर रोड (विस्तारित)
बाभई, बोरीवली (प.), मुंबई-४०००९१
दूरध्वनी : ०२२/२८९८१८५६
e-mail : suresh.deodhar@gmail.com

**कार्यवाह**
**सौ. सरिता मुकुंद देवधर** (कु.वृ.पान ३५९)
११, रामकृष्ण भुवन, गोरेगावकर बिल्डिंग नं. ६,
गिरगाव, मुंबई-४००००४ दूरध्वनी ०२२/२३८५४८११
मोबाईल : ९८२०६५९४४७
e-mail : saritadeodhar50@gmal.com

**सहकार्यवाह**
**विजय गंगाधर देवधर**
(पुणे विभाग कार्यवाह)
गौरी शंकर, १४ गोवर्धन सोसायटी, वीर सावरकर नगर,
पुणे-४११०३७. दूरध्वनी :०२०-२४२६४०३२, ८३०८८०५८९५
e-mail : deodharvg@yahoo.co.in

**कोषाध्यक्ष**
**अकल्पिता चिंतामणी देवधर** (कु. वृ. पान. ८९८)
देवधर हाऊस, दत्त आळी, गांवदेवी चौक, कल्याण
मोबाइल : ९८२०३५६४१३
e-mail : cdakalpita@yahoo.co.in

**सहकोषाध्यक्ष (स्वीकृत)**
**नितेश नारायण देवधर** (कु. वृ. पान. ४७३)
फ्लॅट नं. १२, भारत सावली अपार्ट.२ रा मजला, कल्पतरु टॉवर
समोर, सखाराम कॉम्प्लेक्स, डोंबिवली (प.)
मोबाइल : ९००४१९८९०३
e-mail : nitesh.devdhar@gmail.com

**वाटचाल (स्वीकृत)**
**आशिष राम देवधर** (कु. वृ. पान. ३१)
अतिथी संपादक, वाटचाल
सी/२५, सुरांकित, सिद्धेश्वर आळी, पारनाका,
कल्याण (प.) ४२१३०१ दूरध्वनी : ०९८३३५११५९३
e-mail : ashish.ram.deodhar@gmail.com

**सभासद**
**मधुसूदन दत्तात्रेय देवधर** (कु.वृ.पान ५३१)
११५२,'राधाकृष्ण' सुभाष नगर, १ ली गल्ली, शुक्रवार पेठ,
पुणे-४११००२, दूरध्वनी ०२०-२४४७८१६०

**हेमंत यशवंत देवधर** (कु. वृ. पान. ३१७)
श्री. विवेकानंद को. ऑप. हौ. सोसा., बिल्डिंग नं. १६, ब्लॉक नं.
२, तळमजला, गुरुमंदिरासमोर, सारस्वत कॉलनी, डोंबिवली (पू.)
मोबाइल : ९८३३००७०६४
e-mail : hemant3232@rediffmail.com

**नरेश कृष्णाजी दीक्षित** (कु. वृ. पान. ७२५)
ब ९, ॐ भैरवी सोसा., सम्राट हॉटेल बिल्डिंग,
पं. दीनदयाल मार्ग, डोंबिवली (प.) ४२१२०२
फोन : ०२५१- २४८८७३६ मोबाईल : ९८२०४६७७४२
e-mail : nareshdixit1949@gmail.com

**डॉ. सुनिल गोपाळ देवधर** (कु. वृ. पान. ३१०)
वैनतेय, प्लॉट नं. ३८, प्रेस्टिज पार्क, घाडगे नगर,
नाशिक रोड, नाशिक ४२२१०१. फोन : (०२५३)२४६४७८०
मोबाईल : ९८५०६५४२५०
e-mail : deodharsunil@rediffmail.com

**अविनाश दिवाकर देवधर (स्वीकृत)** (कु. वृ. पान. ९६७)
२, लक्ष्मी विनायक सोसा., मंजुनाथ शाळेशेजारील गल्ली, पाथर्ली,
डोंबिवली (पूर्व) दूरध्वनी ०२५१-२४४५२६२
मोबाइल : ९२२४२६४९६९
e-mail : avinash.deodhar@gmail.com

**रविश देवधर (स्वीकृत)** (कु. वृ. पान. २०२)
ब्लॉक नं. २, आर्य अपार्ट., तळमजला, मराठी शाळेच्या मागे,
पोस्ट - रावतळे, चिपळूण, रत्नागिरी-४१५६०५
दूरध्वनी : ९४२१८९४३५०

**विशेष निमंत्रित**
**रवींद्र प्रभाकर देवधर** (कु. वृ. पान. २०८)
एच १०३, इंटरनिटी को.हौ.सो. इंटरनिटी मॉल शेजारी, तीन हात
नाका, ठाणे (प.) ४००६०४ मोबाइल :९८२०२८४१८३
e-mail : ravi_deo@hotmail.com

**पदसिद्ध सभासद**
**नारायण(दिलीप)गोविंद देवधर** (कु.वृ.पान ४१८)
बी-१०३ RNA हाईटस्, जोगेश्वरी-विक्रोळी जोड मार्ग
(लिंक रोड),अंधेरी, मुंबई-४०००९३.
दूरध्वनी: ०२२/२८२५२१४५ मोबाईल : ९८१९९७२५११
e-mail : deodhardilip@yahoo.com

**मानद लेखा परीक्षक**
**किरण अनंत देवधर** (कु. वृ. पान. १६२)
१०, वेदवती सोसायटी, स्वामी विवेकानंद मार्ग,
संजीवन हॉस्पिटलसमोर, अंधेरी (पूर्व) मोबाइल :९८२०३३५०९३

## आढावा वार्षिक स्नेहसमेलनाचा

# स्नेहसंमेलन सरिता

**– श्री. नरेश कृष्णाजी दीक्षित** (७२५)

सालाबादप्रमाणे वार्षिक स्नेहसंमेलनाची चर्चा कार्यकारिणीत चालू असतांना यंदाचे संमेलन डोंबिवली येथे घेण्याचे निश्चित झाले व आम्हा कार्यकर्त्यांची लगबग सुरू झाली. आमचे कप्तान श्री. अविनाश दिवाकर देवधर यांचे घरी साप्ताहिक, पाक्षिक सभा सुरू झाल्या. आयोजनाच्या पद्धती ठरल्या. विभागवार कार्यकर्ते तयार होतेच. यंदाचा नवा उपक्रम म्हणजे महाराष्ट्रातल्या विविध शहरातल्या मोठमोठया टेलिफोन डिरेक्टरीमधून देवधर शोधायचे त्यांचे फोन नंबर, पत्ता घेऊन त्यांना संपर्क करयाचे . केवळ एकदा संपर्क करून न थांबता नंतरही follow up ठेवायचा. संपर्क यंत्रणा तयार झाली व कार्यरतही झाली. त्याचा फायदा उपस्थितीत अल्प प्रमाणातच वाढ झाली असली तरी प्रचार व प्रसार झाला हे महत्वाचं. कुलबंधुंच्या मनात जागा निर्माण झाली. त्याचा फायदा पुढच्या संमेलनाला झाला तरी चांगल बीजारोपण म्हणता येईल व स्नेहसरिता अशीच वाहत राहील. या सर्व खटाटोपाचा फायदा टेलिफोनच्या माध्यमातून आम्हा संपर्क केलेल्या अकोल्याच्या श्री. गिरीश मधुसुदन देवधर यांच्या उपस्थितीने सिद्ध झाला. कारण त्यांची काहीही माहिती आधीच्या कुलवृत्तांतात नव्हती. देवधर म्हणून संपर्क केला गेला व तो फळाला आला. एकाकी पडलेले कुटुंब स्नेहसरितेत विलीन झाले.

असंच एक उदाहरण म्हणजे २०१४ सालच्या ठाण्याच्या तीळगूळ समारंभाची पूर्वप्रसिद्धी वर्तमानपत्रातून केली होती. तेव्हा डोंबिवलीचे श्री. रवींद्र हरिश्चंद्र देवधर बातमी वाचून उपस्थित राहिले व असेच स्नेहसरितेत समाविष्ट झाले. ते उच्चविद्याविभूषित असून उभयता प्रोफेसर आहेत.

वर्षिक स्नेहसम्मेलनाला प्रमुख पाहुण्यांची अनुपलब्धता ही यंदाची विशेष बाब म्हणता येईल. निश्चित केलेले प्रयत्न आयत्यावेळी अनिश्चित झाले. पण आम्हा कार्यकर्त्यांची घडी अशी घट्ट बसली आहे की कमी तेथे आम्ही ही उक्ती सार्थ ठरावी, त्यासाठी यथायोग्य व्यक्ती सापडली. प्रा. डॉ. सौ. प्राजक्ता अविनाश देवधर, पी.एच.डी. त्यांनी आयत्यावेळी तयारी करून मांडलेले विचार श्रोत्यांना विचार करण्यास प्रवृत्त करणारे तर होते, मार्गदर्शनपर होते. खरंतर 'हातात कळसा नी गावाला वळसा' आम्ही कां घालीत बसलो असा प्रश्न पडाला असो. यंदाची उपस्थिती मागच्या वेळेएवढी (२४०) नसली तरी (१५०) कमी नव्हती. उपस्थितांत तरुणांचाही सहभाग वाखाणण्याजोगा होता. श्री. अविनाश देवधरांनी संक्रांतीचं व संक्रमणाचं महत्त्व पारंपारिक पद्धतीने न सांगता आताच्या जमान्याला पटेल असं विषद केलं.

स्नेहसंम्मेलन विशेषांक ही आपली खास बात. त्याचं मुखपृष्ठ लक्षात राहणारं असावं ही आपली परंपरा. यंदाच्या विशेषांकाचं नाव ठरलं 'स्नेहसरिता', त्याला अनुसरून मुखपृष्ठनिर्मिती ही श्री. आशिष देवधरांची खासियत. वेलवृक्षांच्या राईतून संथपणे सरिता वाहत आहे, क्वचित खळखळाट, पण संयमी वृत्ती... लय भारी. मुखपृष्ठाला साजेशी चारोळी सुचणे ही सौ. पुष्पा नरेश दीक्षितांची सुद्धा खासियतच. शब्द सुमने गुंफून जन्मा येते कविता, कुलबांधवांच्या ऐक्याने मनामनात वाहे स्नेहसरिता.

अजून अंक उघडायचाच आहे. श्री. अविनाश व अनंत देवधरांच्या संपादकीयानंतर देवधर मंडळाची अथपासूनची वाटचाल श्री. दिलीप

देवधरांनी शब्दात गुफली आहे. त्यात आपल्या १९९२ च्या कुलवृत्तांताला इंटरनॅशनल स्टॅण्डर्ड नंबर मिळविणारा आपला देवधरांचा कुलवृत्तांत पहिलाच असल्याचं समजलं. त्याचा ISBN No. -८१-८५६००-११-२ असा आहे. नमूद करण्यासारखी बाब म्हणजे आपल्या ल. वि. दीक्षितांनी टिळकांच्या कुलवृत्तांतासाठी प्रस्तावना लिहून दिलेली होती, त्यातही याचा उल्लेख दिसतो. श्री. वा. ना. देवधरांचं देवकार्य म्हणून मंडळाची केलेली सेवा समजली तर श्री. सुधीर देवधरांनी आठवणींना उजाळा दिला. वा.नां.च्या कृपेने १९७४ च्या पहिल्या संमेलनापासून आताच्या ४२ व्या संमेलनाच्या तारखा व स्थळं समजली. श्री. नरेश दीक्षितांच्या संकलनातून महनीय व्यक्तींनी प्रतिपादलेली मते जाणता आली. त्यात लोकमान्य टिळक, पं. जवाहरलाल नेहरू, रँग्लर परांजपे, म. म. पोतदार, विद्याधर गोखले वगैरे यांचा समावेश आहेच. तसेच कुलवृत्तांत हे एक प्रकारचे पूज्यपितरांचे स्मरण व वाङमय श्राध्द आहे ही प्रतिक्रिया भावली. त्यांना गोडशांच्या कुलवृत्तांतात एक वाक्य सापडलं- महिकावतीची बखर इ.स. ११३८ च्या दरम्यान प्रतापबिंबास आशीर्वाद देण्यासाठी पैठणहून आलेल्या ब्राह्मणांमधे देवधर व छत्रे ही खास चित्पावनी आडनांवे दिसून येतात. याचा अर्थ देवधर हे आडनांव इतके जुने आहेतर. गंमत म्हणजे कुलवृत्तांत फक्त आम्हीच बनवित नाही तर अमेरिकेत १२०० कुलवृत्तांत प्रसिद्ध झाल्याचे सायंटिफिक अमेरिकन च्या अंकात असल्याचं श्री. मो. ह. खरे यांचं निरीक्षणही समजलं.

वा.नां.चे सुविचार तर स्मिता देवधरांचं एका तरुणाचं धाडस नव्या पिढीला विचार करण्यास प्रवृत्त करणारं. पण अहमदाबादस्थित डॉ. सतीश य. देवधरांचा अनुभव आनंदाचा व आश्चर्याचा धक्का देणारा. ते उच्चविद्याविभूषित आहेतच शिवाय

पान क्र. ७ वर

# पुणे विभागाचा तीळगूळ समारंभ

पुणे विभागाचा तीळगूळ समारंभ रविवार दिनांक १७/१/२०१६ रोजी सायंकाळी ४.३० ते ६.३० या वेळेत राहूलनगर सोसायटीच्या हॉल मध्ये संपन्न झाला. प्रमुख अतिथी म्हणून श्री विकास देवधर आले होते. ''आपण इंजिनियर असून सॉफ्टवेअर (IT) मध्ये प्रयत्न करून पाहावा म्हणून एका मित्राचे सोबतीने व्यवसाय सुरू केला. तो हळू हळू वाढून आता व्याप खूप वाढला आहे'' असे त्यांनी सांगितले. प्रमुख वक्ते म्हणून श्री. अविनाश देवधर यांना खास बोलावले होते.

त्यांचा परिचय करून देतांना त्यांच्या अनेक पैलूंचे ज्ञान सर्वांना झाले. शास्त्रोक्त संगीताचा त्यांचा अभ्यास असून, ते बुद्धिबळपटू आहेत. विद्यापीठ स्तरावर ते पारितोषिक विजेते आहेत. आयुर्वेदाचा त्यांचा गाढा अभ्यास आहे.

घरातील उपलब्ध असलेल्या औषधी द्रव्यांचा किती सुंदर प्रकारे आपण घरच्या घरी आजारावर मात करू शकतो हे त्यांनी सांगितले. काथ, लवंग, हळद, मध, सुंठ, दालचिनी,धणे, जिरे यांचे उपयोग त्यांनी कथन केले. ब्रम्हमुहूर्तावर उठण्याचे महत्त्व त्यांनी सांगितले.

नाश्ता व चहा झाल्यानंतर सौ. वसुंधरा पर्वते ह्यांनी सर्वांचे आभार मानले. श्री. महेंद्र देवधर ह्यांनी फोटो काढून स्मृती ठेवल्या. उपस्थिती अपेक्षेपेक्षा कमी असली तरी कार्यक्रम छान झाला.

**– पु. गो. देवधर**

***

## आढावा वार्षिक स्नेहसमेलनाचा

# असे झाले वार्षिक स्नेहसंमेलन

– डॉ. सौ. सुगंधा सुरेश देवधर

या वर्षीचे मंडळाचे वार्षिक स्नेहसंमेलन आणि तीळगूळ संमलेन दि. २४ जानेवारी २०१६ रोजी डोंबिवली येथील कऱ्हाडे समाज मंदिरात संपन्न झाले.

हे संमेलन यशस्वी होण्यासाठी डोंबिवलीकर कुलबंधुंनी गेले दोन महिने अविश्रांत मेहेनत घेतली होती. त्या मेहेनतीला चांगले यश मिळून सुमारे १५० कुलबंधुभगिनींनी या संमेलनात भाग घेतला.

सकाळी ९.३० वाजता सभागृहाचे प्रांगण छानश्या रांगोळीने सजले होते, दारावर तोरण होते, आणि डोंबिवलीकर स्वागत समितीचे सदस्य स्वागतासाठी तयार होते. येणाऱ्या बंधुंचे गंध लाऊन व भगिनींचे हळदकुंकू लावून स्वागत होत होते. सर्वांना तीळगूळ देऊन गोड बोलण्याची विनंती केली जात होती.

सभागृहात प्रवेश केल्यावर गरमगरम उपमा व चहा-कॉफी नाश्त्यासाठी तयार होती.

१०.३० वाजता सभेला सुरुवात झाली. कार्यवाह सौ. सरिता देवधर यांनी उपस्थितांचे स्वागत करून सर्वांना नवीन वर्षाच्या शुभेच्छा दिल्या. नंतर प्रमुख पाहुण्या डॉ. प्राजक्ता देवधर आणि मंडळाचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम देवधर यांच्या हस्ते श्री केशवराज व श्री परशुरामाच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्ज्वलन होऊन समारंभाचे औपचारिक उद्घाटन झाले. नंतर केशवराज व परशुरामाची आरती सर्वांनी म्हटली.

गेल्या वर्षभरात जे कुलबंधु-भगिनी आपल्याला सोडून गेले त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.

त्यानंतर प्रास्ताविकामध्ये सौ. सरिता देवधर यांनी संमेलनाचे महत्त्व विषद केले. '' परस्पर परिचय व्हावा, एकमेकांचे सुखदु:ख वाटून घ्यावे, गरजुंना मदत मिळावी, आपले विस्तृत असे एक कुटुंब व्हावे या उद्देशाने आपण एकत्र येत असतो'' असे मत त्यांनी मांडले.

त्यानंतर त्यांनी आजच्या प्रमुख पाहुण्या डॉ. प्राजक्ता अविनाश देवधर यांची ओळख करून दिली. गेली ३६ वर्षे डोंबिवलीतील पेंढारकर कॉलेजमध्ये त्या फिजिक्स या विषयाचे अध्यापन करीन आहेत. स्त्रीशक्ती संघटनेसाठी त्या काम करतात. तसेच मराठी विज्ञान परिषदेतही त्या कार्यरत आहेत. पुष्पगुच्छ देऊन अध्यक्षांनी त्यांचे स्वागत केले.

तीळगूळ संमेलन असल्याने श्री. अविनाश देवधर यांनी संक्रांत सणाचे महत्त्व मार्मिकरित्या कथन केले. संक्रांत सण, सूर्याचे मकर राशीत होणारे संक्रमण, संक्रमण म्हणजे धैर्य सोडून प्रगतीकडे केलेली वाटचाल, विचारात केलेला सकारात्मक बदल. आपणही आपल्या वृत्तीत सकारात्मक बदल केला पाहिजे. नोकरी करण्याचा विचार बदलून व्यावसायिक होण्याकडे संक्रमण करावे असे त्यांनी सांगितले. आपल्या बांधवांनी एकत्र यावे, एकमेकांना साहाय्य करून समाजात स्थैर्य मिळवावे, जूनं ते सर्व सोडून न देता, संध्या - पंचमहाभूतं - देवपूजा, धार्मिक प्रथा यांचा वैज्ञानिक दृष्टिकोनातून विचार व्हावा असे सांगून सर्वांना विचार करण्यास प्रवृत्त केले.

नंतर प्रमुख पाहुण्या डॉ. प्राजक्ता देवधर यांनी आपले विचार मांडले. 'एक कुलबंधू म्हणून माझ्या मंडळाकडून काय अपेक्षा आहेत, मी मंडळासाठी

का करू शकतो, तसेच मंडळाच्या सभासदांकडून काय अपेक्षा आहेत' या जिव्हाळ्याच्या विषयावर त्यांनी मतप्रदर्शन केले.

**मंडळाची अपेक्षा** काय तर अधिकाधिक सभासद मंडळाशी जोडले जावेत, मंडळाच्या कार्यात जास्तीत जास्त सभासदांचा सक्रीय सहभाग असावा, त्यासाठी आज आलेल्या प्रत्येक सभासदाने पुढील कार्यक्रमासाठी किमान एक नवीन व्यक्ती कशी येईल हे पाहावे. आजच्या विभक्त कुटुंबात माणसांची गरज आहे, ती अशा विस्तृत कुटुंबाकडून भागवता येऊ शकते. मंडळाला अधिक देणग्या मिळाव्यात, प्रत्येक व्यक्तीमध्ये काहीना काही गुण असतातच. ते विकसित होऊन मंडळाला त्याचा फायदा मिळावा, मंडळ अधिकाधिक समृद्ध व्हावं जेणेकरून ते जास्तीत जास्त कार्यरत होईल.

एक सभासद म्हणून मंडळाकडून अपेक्षा - मंडळाच्या माध्यमातून लोकांचा परिचय व्हावा, एकमेकांना वेळप्रसंगी मदत मिळावी, वर्षभर स्पर्धा, सहली, छोटे मेळावे असे अनेक कार्यक्रम, निदान विभाग पातळीवर तरी व्हावेत. मुंबई-पुण्याव्यतिरिक्त इतरही ठिकाणी असे कार्यक्रम व्हावेत म्हणजे तिथले सभासद भाग घेऊ शकतील.

प्रमुख पाहुण्यांच्या मार्गदर्शनानंतर सत्कार समारंभ संपन्न झाला. वयाची ७५ वर्षे पूर्ण केलेल्या कुलबंधु-भगिनींचा अमृतमहोत्सवी सत्कार, विवाहाची ५० वर्षे पूर्ण करणाऱ्या जोडप्यांचा सत्कार सन्मानपत्रे देऊन करण्यात आला. तसेच विविध स्पर्धांमध्ये, परीक्षांमध्ये प्रावीण्य मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा व व्यक्तिंचा गुलाबपुष्प व रोख रक्कम देऊन गौरव करण्यात आला.

सत्कार समारंभानंतर मंडळाचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम देवधर यांनी आपले विचार मांडले.

वार्षिक संमेलनं, तीळगूळ समारंभ यांच्याशिवाय माहेरवाशिणींचे संमेलन, निरनिराळ्या स्पर्धा, सहली यांसारखे कार्यक्रम व्हावेत असे मतही त्यांनी मांडले.

त्यानंतर 'इच्छापत्र' या विषयावर माहितीपर निवेदन श्री. संदीप नेर्लेकर यांनी केले.

'इच्छापत्र' या गंभीर विषयावर अत्यंत खुसखुशीत शैलीत, श्रोत्यांशी हसतखेळत संवाद साधत ते बोलत होते. इच्छापत्र का करावे? कसे करावे? on line इच्छापत्र कसं करता येतं याचं अनेक छोट्यामोठ्या गोष्टी सांगत त्यांनी निवेदन केलं. त्यामुळे सर्वांनाच हा विषय समजला, आवडला.

शेवटी हे संमेलन यशस्वी होण्यासाठी डोंबिवलीकर कार्यकर्त्यांनी विशेष मेहेनत घेतली. त्यांचे गुलाबपुष्प देऊन मंडळातर्फे कौतुक करण्यात आले.

तोपर्यंत सर्वांना भूक लागली होतीच, त्यामुळे सर्वजण जेवणाच्या हॉलकडे वळले. गूळपोळी, डाळिंबी उसळ, बटाटेवडे असा आकर्षक मेनू होता. सर्वांनी मनापासून आस्वाद घेतला.

भोजनोत्तर सत्रात आपल्या सभासदांचाच गायनाचा कार्यक्रम होता. तो चांगलाच रंगला.

नंतरचा कार्यक्रम म्हणजे आभारप्रदर्शन. मंडळाचे उपाध्यक्ष श्री. सुरेश देवधर यांनी सर्वांचे आभार मानले. ''अमंत्रं अक्षरं नास्ति, न मूलि अनौषधम्, अपात्र: पुरुष: नास्ति, योजक: तत्र दुर्लभ:'' असं म्हणून हा कार्यक्रम उत्तमपणे घडवून आणणाऱ्या, प्रत्येक कार्यकर्त्याकडून त्याच्या गुणांचा उपयोग करून घेऊन ज्या टीम लीडरने हे काम करवून घेतले, त्याच्या योजकतेचे त्यांनी विशेष कौतुक केले. नंतर पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. समारंभाच्या सुखद स्मृतींसह सर्वजण घरी परतले.

***

# तीळगूळ समारंभ, नाशिक

दि. ३१ जानेवारी २०१६ रोजी हरी ओम रेसिडेन्सी, इंदिरा नगर, येथे नाशिकमधील देवधर-दीक्षित-ढमढेरे कुलबंधू भगिनींचा तीळगूळ समारंभ ११ ते २ या वेळेत आयोजित करण्यात आला होता. प्रा. डॉ. सुनील देवधर आणि शुभांगी देवधर यांनी उत्तम पद्धतीने या कार्यक्रमाचे आयोजन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान नाशिकस्थित डॉ. वा. रा. देवधर यांनी भूषविले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते परशुराम व केशवराज यांचे पूजन व दीपप्रज्वलन करण्यात आले. मंडळाचे उपाध्यक्ष श्री. सुरेश देवधर यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

सौ. शुभांगी देवधर यांनी संक्रांत सणाचे महत्त्व सांगतांना आपण भारतीय आहोत हा न्यूनगंड दूर करून विचारांचे संक्रमण व्हावे असे सांगितले. तसेच देवधर मंडळाचा तीळगूळ समारंभ ही संकुचित विचारसरणी नसून त्याद्वारे आपण कुलबांधव एकत्र येऊन, हळूहळू सर्व समाजाला एका बंधनात बद्ध करून, विचारांचे संक्रमण करण्याच्या प्रक्रियेची ही सुरुवात आहे असे विचार व्यक्त केले. प्रा. डॉ. सुनील देवधर यांनी ''तरुण उद्योजक तयार होण्याच्या दृष्टीने पावले टाकली पाहिजेत असे सांगत युवकांनी सैन्यदलाकडे एक उत्तम करियर म्हणून पाहावे'' असे सांगितले. ग्रुप कॅप्टन विनायक देवधर यांनी हवाई दलातील संधी याविषयी बोलताना ''हवाई दलातील मराठी माणसांची कमी होणारी संख्या निश्चितच खेदजनक आहे'' अशी खंत व्यक्त केली. याच कार्यक्रमात इंग्लिश ऑलिम्पियाड मध्ये सुवर्णपदक मिळविल्याबद्दल चैतन्य देवधर याचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. वा. रा. देवधर यांनी आपल्या भाषणात देवधर मंडळाची कार्यकारणी आणि त्यांचे कार्य याबद्दल अतीव समाधान व्यक्त केले व मंडळाला तसेच उपस्थितांना शुभेच्छा देऊन तीळगूळाचे वाटप केले.

कार्यवाहक सौ. सरिता देवधर यांनी आपल्या खुमासदार शैलीत कार्यक्रमाची सांगता करतांना आयोजकांचे आणि उपस्थितांचे आभार मानले.

नाशिक मधील कुलबंधु-भगिनी तसेच माहेरवाशिणी आणि कार्यकारणीचे सदस्य मिळून सुमारे ३५ जण उपस्थित होते. यावेळी श्रीमती नलिनी गोपाळ देवधर यांनी मंडळास रु.३०००/- देणगी देऊन मंडळाच्या उपक्रमांना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर स्नेहभोजनाचा कार्यक्रम झाला.

हा समारंभ यशस्वी करण्यासाठी प्रा. डॉ. सुनील देवधर, शुभांगी देवधर, यश देवधर, दीप देवधर आदींनी अथक परिश्रम घेऊन उत्कृष्ट संयोजनाचा एक वस्तुपाठ घालून दिला.

***

---

पान क्र. ४ वरून

ज्ञानप्राप्ती व प्रचारासाठी जगभर फिरलेले व्यक्तिमत्व आहे. इंडियन इन्स्टिट्यूट व मॅनेजमेंट अहमदाबाद येथे सर्वोच्चपदी कार्यरत आहेत. ते एकदा अमेरिकेतील सॉल्टलेक सिटीमधे असलेल्या जगातील सर्वात मोठया संचयिकेत (लायब्ररी) गेले व कुलवृत्तांत विभागाची चौकशी केली. तेव्हा तेथल्या माणसाने आपण पश्चिम महाराष्ट्रातील चित्तपावनांच्याबद्दल विचारणा करीत आहात कां? असा प्रश्न केला व उत्तर होकारार्थी आल्यावर व देवधर आडनांव सांगितल्यावर आपल्या जुन्या कुलवृत्तांताची प्रत समोर ठेवली. त्यात त्यानां त्यांच्या आजोबांचे व काकांचे फोटो पाहून आश्चर्य वाटलंच पण ऊर भरून आले हीच खरी पावती.

***

# देवधर मंडळ

## ⁕ वार्षिक सर्वसाधारण सभा ⁕

देवधर मंडळाची ४० वी 'वार्षिक सर्वसाधारण सभा' **रविवार दिनांक ७ ऑगस्ट २०१६ रोजी** डोंबिवली येथे आयोजित करण्यात आली आहे. देवधर मंडळाच्या सर्व आजीव सभासद आग्रहाची विनंती की, या सभेस आपण आवर्जून उपस्थित राहावे.

या वर्षी सध्याच्या कार्यकारिणीची मुदत पूर्ण होत असल्याने नवीन कार्यकारिणी निवड करण्यासाठी वार्षिक सर्वसाधारण सभेत यंदा गरज असल्यास निवडणूक प्रक्रिया होणार आहे.

निवडणूक अधिकारी म्हणून श्री. गणेश शंकर देवधर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

त्यांनी आखल्याप्रमाणे

| | |
|---|---|
| दि. १० जुलै ते १७ जुलै २०१६ | उमेदवारी अर्ज दाखल करणे |
| दि. १८ जुलै ते २० जुलै २०१६ | छानननी करून वैध अर्ज ठरविणे |
| दि. २१ जुलै ते २३ जुलै २०१६ | अर्ज मागे घेणे |
| दि. २४ जुलै २०१६ | अंतिम यादी जाहीर करणे |
| दि. ७ ऑगस्ट २०१६ | गरज असल्यास मतदान |
| दि. ७ ऑगस्ट २०१६ | मतदानानंतर काही वेळानी निकाल जाहीर करणे |

असा निवडणूक कार्यक्रम आहे.

सदर सभेची व निवडणुकीच्या कार्यक्रमाची सूचना, वार्षिक सभेचे ठिकाण इत्यादि माहिती जून २०१६ च्या वाटचालच्या अंकामध्ये येणार आहेच.

श्री. गणेश शंकर देवधर यांचा पत्ता व ईमेल पुढीलप्रमाणे :-

गणेश शंकर देवधर (कु. वृ. पान ५८५),

प्लॉट नं.५, पारिजात, ४ सी, रूम नं. ५, नागरी निवारा, गोरेगाव (पू.) मुंबई-४०००६३.

मो. नं. ९९२०३५६४४४ ⁕ gsdeodhar43@gmail.com.

– सौ. सरिता मुकुंद देवधर (कार्यवाह)

## पत्ता बदलला असेल तर

आपला किंवा आपल्या नातेवाईकांचा, ओळखीच्या कुलबंधू-भगिनींचा पत्ता बदलला असेल तर तो वाटचालकडे जरूर पाठवावा. अपुरा पत्ता अथवा पत्ता सापडत नाही असा शिक्का मारून पोष्टातून परत आलेल्या नावावरील अंक पाठविणे बंद केले जाते.

कृपया पत्ता बदलल्याचे कार्यकारिणी सदस्य श्री. नरेश कृष्णाजी दीक्षित यांचेकडे कळवून मंडळास सहकार्य करावे. त्यांचा पत्ता कार्यकारिणीच्या यादी ज्या पानावर छापली आहे त्यावर आहेच. अंक पाठविणे थांबविण्यापेक्षा तो योग्य हाती पोहोचविण्यात मंडळास जास्त आनंद वाटतो. धन्यवाद!

-संपादक

# आसूदच्या केशवराज मंदिरात विद्युतव्यवस्था

## चिपळूणच्या श्री. प्रमोद देवधरांकडून मंदिरास देणगी

*देवधरनगर, चिपळूण, जि. रत्नागिरी येथील श्री. प्रमोद केशव देवधर यांनी केशवराज मंदिर, आसूद येथील मंदिरात स्वखर्चाने विद्युतव्यवस्था करून दिली आहे. तशा आशयाचे पत्र त्यांनी नुकतेच मंडळाचे अध्यक्ष श्री. पुरुषोत्तम देवधर यांच्याकडे पाठविले आहे. भविकांची मोठी सोय त्यामुळे होणार आहे. श्री. प्रमोद यांनी अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेले हे काम पूर्ण केले आहे. त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन. त्याबद्दलची सविस्तर माहिती कुलबंधु-भगिनींना कळावी यासाठी त्यांनी अध्यक्षांना पाठविलेले पत्रच प्रसिद्ध करीत आहोत. - संपादक*

प्रति, मा. अध्यक्ष, देवधर मंडळ

आपल्या कुलस्वामीला एक सोलार मशीन द्यावे अशी विनंती देवळाच्या पुजाऱ्यांनी गेल्यावर्षी मला केली होती. परंतु आधीच तेथे दोन सोलार मशीन्स खराब अवस्थेत पडून होती. त्यामुळे मी त्यांना काही काळ थांबण्यास सांगितले. त्यांना म्हटले, ''थोडे दिवस थांबा. माझे एक महत्त्वाचे काम होणार आहे. ते झाले की मी आपल्या देवाला महाराष्ट्र राज्य वीज मंडळाकडून लाईट कनेक्शन व मीटर घेऊन देतो.'' त्याप्रमाणे माझे काम पूर्ण होताच महाराष्ट्र राज्य वीज मंडळाचा कॉंट्रॅक्टर असलेल्या माझ्या मित्राला बरोबर घेऊन श्री केशवराजच्या साईटवर जाऊन संपूर्ण सर्व्हे पूर्ण केला. आवश्यक तेवढे स्ट्रीट लाईट, पोल्स, देवळाच्या गाभाऱ्यापर्यंत मंडळाचे कनेक्शन याची सर्व माहिती गोळा करून एक प्रोजेक्ट बनविला, खर्चाचा अंदाज काढला व काम सुरू केले. आज आपल्या कुलस्वामीला लाईट व्यवस्थेचे काम, जाताना स्ट्रीट लाईटचे काम, देवळातील लाईट सप्लायचे काम पूर्ण झाले असून, देवळातील एक पुजारी श्री. मोरेश्वर डेपोलकर यांचे घराबाहेरील खांबावर आपल्या देवस्थानचे मीटर बसविलेले आहे. म्हणून आज दिनांक ७ मार्च २०१६ रोजी देवधर मंडळाचे अध्यक्ष या नात्याने आपणाकडे हा पत्रव्यवहार करीत आहे तसेच आपणास हा उपक्रम सुपूर्त करीत आहे. माझ्या हातून हे काम झाले याचा अर्थ माझे नशीब थोर, तसेच श्री साईबाबा व श्री केशवराजाचे आशीर्वाद हेच आहे.



मी जोपर्यंत हयात आहे तोपर्यंत या मीटरचे बिल व मेंटेनन्सचा खर्च मी स्वत: करणार आहे. माझ्या पश्चात हे काम देवधर मंडळाने करावयाचे आहे. बिल व मेंटेनन्सच्या संदर्भातील कामे श्री. मोरेश्वर डेपोलकर व त्यांचे बंधू पाहणार आहेत. आपण त्यांच्या संपर्कात राहावे ही नम्र विनंती.

पुन्हा एकदा श्री देव केशवराज व देवधर मंडळास हा प्रोजेक्ट अर्पण करून माझे म्हणणे थांबवतो.

आपला

**प्रमोद केशव देवधर**

चिपळूण

# देवधर मंडळ म्हणजे एकत्र कुटुंबच वाटलं.

## डोंबिवलीच्या सौ. मंजिरी देवधर यांचा अनुभव

या वर्षी २४ जानेवारी २०१६ रोजी आपले देवधर - दीक्षित - ढमढेरे कुलसंमेलन डोंबिवली येथे यशस्वीरित्या संपन्न झाले. या संमेलनाची तयारी खूप आधीपासून सुरू झाली होती. त्यात सिंहाचा वाटा उचलला होता श्री. अविनाश देवधर यांनी. साधारणत: तीन महिने आधीपासून काकांनी मिटिंग्ज घ्यायला सुरुवात केली होती. शनिवारी किंवा रविवारी आम्ही भेटत होतो. त्यादिवशी काका सांगितलेल्या कामांचा आढावा घ्यायचे व नवीन कामे वाटून द्यायचे. या सगळ्या कामांच्या यादीत एक अतिशय महत्त्वाचे काम काकांनी आम्हा सर्वांना करायला सांगितले होते ते म्हणजे दूरध्वनीवरून कुलबंधु-भगिनींशी संपर्क करणे.

पुणे, नाशिक, सांगली, मिरज, सोलापूर, रत्नागिरी अशा विविध ठिकाणच्या कुलबंधु-भगिनींना संमेलनासाठी आमंत्रित करायचे होते. अविनाशकाकांनी बी. एस्. एन्. एल्. च्या वेबसाईटवरून विविध ठिकाणच्या देवधर मंडळींचे दूरध्वनी क्रमांक मिळविले होते. त्यांनी ते आम्हा सगळ्यांना वाटून दिले. प्रत्येकाचा वेगळा कागद तयार होता. माझ्या वाट्याला सांगली, सोलापूर, कोल्हापूर या विभागातील नावे व नंबर्स आले होते.

आता मनात प्रश्न होता की जरी हे सगळे देवधर-दीक्षित-ढमढेरे असले तरी अनोळखीच ना! माझा फोन यांनी उचलल्यावर बोलायला सुरुवात कशी करायची? काय बोलायचं आणि सगळ्यात जास्त भीती किंवा शंका होती ती म्हणजे आपण बोलल्यावर समोरून कशी प्रतिक्रिया येईल ही. काकांची सूचना होतीच की औपचारिक पद्धतीने आमंत्रण द्यायचं नाही. अगदी आपल्या घरचं कार्य असल्यासारखं अशिय आपुलकीने बोलावणं करायचं. तसंच करण्याचा प्रयत्न केला आणि आश्चर्य म्हणजे खूप छान अनुभव आला. एखाद-दोन ठिकाणे वगळता सगळीकडून खूप छान प्रतिसाद मिळाला. जेवढ्या आपलेपणानी मी त्यांच्याशी बोलले, आग्रहाचं आमंत्रण केलं, तेवढ्याच उत्साहाने आणि आपुलकीने माझ्या सासरच्या लोकांनी, अहो म्हणजे सगळ्या देवधर मंडळींनी आग्रहाच्या निमंत्रणाला आणि फोन करण्याला प्रोत्साहनही दिलं. सगळ्यांनाच यायला जमलं नाही ज्यांना जमणार नव्हतं, त्यांनी कारणं सांगितली, आणि हळहळही व्यक्त केली. काही मंडळी लगेच 'हो' म्हणाली आणि आलीही. विशेष उल्लेख करावासा वाटतो तो सांगलीचे श्री. गोपाळ यशवंत देवधर यांचा. मी आमंत्रण केलं तेव्हा त्यांचं नक्की ठरत नव्हतं. पुन्हा एकदा दहा-बारा दिवसांनी फोन केल्यावर म्हणाले की ''यायला काहीच हरकत नाही परंतु डोंबिवलीमध्ये माझ्या ओळखीचं कोणी नाही. संमेलन सकाळी ९.०० वाजता असल्याने रात्रीच गाडीत बसावं लागणार होतं. मग कल्याण डोंबिवलीला उतरल्यावर जाणार कुठे, सामान कुठे ठेवायचं, आंघोळ वगैरे सगळं कुठे उरकायचं हा प्रश्न आहे.'' त्यावर मी म्हटलं की ''काका माझ्याकडे उतरा. संमेलनाचे ठिकाण माझ्या घराच्या अगदी जवळ आहे.'' आधी त्यांना खूपच संकोच वाटला. परंतु नंतर दोनदा-तीनदा फोन केल्यावर ते तयार झाले. त्यांच्या पत्नीही येणार होत्या, परंतु आयत्यावेळी काही काम निघाल्याने गोपाळकाका एकटे आले. जेवायला आमच्याकडे परंतु झोपायला व आवरायला अविनाशकाकांकडे गेले. त्यावेळी खरंच हे एकत्र कुटुंब असल्यासारखंच वाटलं. संमेलनाला येता न आल्याबद्दल सौ. गीता यांना खूप वाईट वाटलं. एकंदरीत या फोनवरून संपर्क साधण्याचा अनुभव खूपच चांगला होता. नवीन ओळखीही झाल्या या निमित्ताने.

- सौ. मंजिरी देवधर, डोंबिवली.

# वडिलांच्या स्मृतींना सुखद उजाळा

## रणजी करंडक स्पर्धेची अंतिम लढत पुण्यात येथे झाली त्यावर प्रा. दि. ब. देवधर यांच्या कन्येची प्रतिक्रिया

''इतक्या वर्षानी रणजी ट्रॉफीची फायनल आपल्याकडे होत आहे हे ऐकून छान वाटले. माझ्या वडिलांनी जी कामगिरी केली आहे त्या सुखद स्मृतींना उजाळा मिळाला आहे'' अशी भावना दिवंगत प्रा. दि. ब. देवधर यांची कन्या डॉ. सुमन आठवले यांनी व्यक्त केली.

पुण्यात ७६ वर्षांनी रणजी करंडक अंतिम सामना होत आहे. १९३९-४० च्या मोसमात पुना क्लबच्या मैदानावर महाराष्ट्राने संयुक्त प्रांत संघाला हरवून विजेतेपद मिळविले होते. त्यावेळचे विजयी कर्णधार प्रा. दि. ब. देवधर यांनी 'क्रिकेटमहर्षी' हे बिरुद मिळण्याच्या वाटचालीतील पहिला टप्पा होता. वैयक्तिक आयुष्यातही शतकवीर ठरलेल्या या 'क्रिकेटमर्हषी'चा महाराष्ट्र क्रिकेट संघटनेने कालांतराने गहुंजे येथील आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर पूर्णाकृती पुतळा उभारला. याच स्टेडियमवर मुंबई-विरुद्ध सौराष्ट्र सामना होणार आहे. विशेष म्हणजे १९४० मध्ये २४ फेब्रुवारी रोजी अंतिम सामना सुरू झाला होता त्यामुळे हा तारखेचा योगही जुळून आला आहे.

यानिमित्त डॉ. सुमन यांची भेट घेतली असता त्यांनी सांगितले, ''आमचे वडील क्रिकेट खेळायचे. पण त्यांनी त्याकाळी आम्हा मुलींना खेळायलाही प्रोत्साहन दिलं. अभ्यासात मात्र ते तडजोड करू द्यायचे नाहीत. आम्हाला खेळण्यासाठी अभ्यासात सूट मिळाली नाही. त्यामुळे त्यांचा खेळ पाहण्यासाठी शाळा बुडवून जायचा प्रश्नच नव्हता.''

प्रा. देवधर यांच्या नेतृत्त्वाखालील महाराष्ट्राने ३९-४० व ४०-४१ असे सलग दोन मोसम रणजी करंडक जिंकला. या आठवणींविषयी त्या म्हणाल्या, ''रणजी विजेते म्हणून महाराष्ट्राची पुढील मोसमात मुंबईविरुद्ध पुनाक्लबच्या मैदानावरच लढत झाली. पुण्याची पहिली बॅटिंग होती. काकांनी (आम्ही वडिलांना काका म्हणायचो.) द्विशतक काढले. आपण मोठी धावसंख्या (६७५) उभारली. मुंबईकडूनही विजय मर्चंट (१०९), खंडू रांगणेकर (२०२) चांगले खेळले. आपण थोडक्यात आघाडी (२५) घेतली. त्या सामन्याची फार उत्सुकता होती.

डॉ. सुमन यांनी त्यांच्याकडील काही दुर्मीळ दस्ताऐवज प्रस्तुत प्रतिनिधीला दाखविले.

एका स्मरणिकेत चित्रकार डी. डी. रेगे यांनी लिहिले आहे की, ''१९२६ साली गिलीगनच्या एम्.सी.सी. संघाविरुद्ध मुंबईच्या युरोपियन जिमखान्यावर देवधरांनी मी मी म्हणणाऱ्या ब्रिटीश गोलंदाजांचे चेंडू बेदरकारपणे झोडपून १४६ धावांचा प्रचंड मेरू उभारला होता. मला तेव्हा वृत्तपत्रीय कात्रणे जमवायचा छंद होता. इंग्रजी वृत्तपत्रातील त्यावेळचे त्यांचे भरदार मिशा, सणसणीत शरीरयष्टी, पाणीदार डोळ्यांचे छायाचित्र मी जपून ठेवले आहे. कालांतराने मी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या सहवासात आलो त्यावेळी हे कात्रण पाहून त्यांचे उद्‌गार होते - शाब्बास बहाद्दर! अरे ही सुद्धा एक मोठी देशसेवाच आहे. देवधर हे हातांच्या बॅटचे शस्त्र धरून ब्रिटिशांशी युद्ध खेळले. ही लहानसहान गोष्ट नव्हे. देवधर हेही एक स्वातंत्र्य क्रीडावीर आहेत.

***

(सकाळ दि. २४/२/२०१६ वरून साभार)

# मंडळातर्फे देण्यात येणाऱ्या शैक्षणिक मदतीसंदर्भात

नेहमीप्रमाणे २०१६-१७ या शैक्षणिक वर्षाकरिता मंडळाच्या नियमाप्रमाणे गरजू/हुशार कुल विद्यार्थ्यांना (मुले-मुली) शैक्षणिक मदत देण्यात येईल. त्यासाठी साध्या कोऱ्या कागदावर अर्ज करावे.

१) विद्यार्थ्यांचे नाव
२) गेल्यावर्षीचे गुणपत्रक (झेरॉक्स)
३) शैक्षणिक वर्षात शिक्षण घेत असलेल्या विद्यालयाचे/महाविद्यालयाचे/शिक्षण संस्थेचे मूळ बोनाफाईड सर्टिफिकेट
४) पालकांच्या उत्पन्नाचा दाखला अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

अर्जात खालील सदरांसह आपली पूर्ण माहिती लिहावी.

- पालकाचे नांव/पत्ता (पिन कोड/टेलिफोन नंबरसह)
- विद्यार्थ्यांचे/विद्यार्थींनीचे पूर्णनांव / पत्ता / जन्मदिनांक
- यंदा प्रवेश घेतलेली इयत्ता
- पालकाचे वार्षिक उत्पन्न
- पालकाच्या उत्पन्नाच्या दाखल्याऐवजी दोन स्थानिक प्रतिनिधींच्या किंवा दोन आजीव सभासदांच्या शिफारशी (घरांतील/नात्यातील आजीव सभासदांखेरीज)
- अगोदरच्या २०१५-१६ साली मिळालेले गुण.
- बँक खाते क्रमांक
  बँकेचे नाव व शाखेचे नाव
- पालकांची स्वाक्षरी,
- तारीख (अवश्य)

अशा तऱ्हेने परिपूर्ण अर्ज १ जुलै २०१६ ते दि. २० ऑगस्ट २०१६ या कालावधीत साध्या पोष्टाने कार्यवाह सौ. सरिता देवधर यांचेकडेच पाठवावेत. हस्ते परहस्ते पाठवू नयेत.

अपूर्ण व उशिरा मिळालेल्या अर्जांवर विचार केला जाणार नाही. काही तांत्रिक कारणाने (निकालास उशीर इ.) सदर तारखेपूर्वी अर्ज पाठविता येत नसल्यास आगाऊ लेखी कळविणे आवश्यक आहे. वरील प्रमाणे सर्व माहिती एकत्रित न आल्यास मदत पाठवणे शक्य होणार नाही.

पत्ता : सौ. सरिता मुकुंद देवधर (कार्यवाह)
११ रामकृष्ण भुवन, गोरेगांवकर बिल्डिंग नं. ६ गिरगांव, मुंबई ४. दूरध्वनी ०२२-२३८५४८११

***

## मराठी विज्ञान परिषद शिबिर

१० वी ची परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांसाठी सुट्टीमधील उपक्रम

परीक्षेच्या ताण तणावातून सुटल्यानंतर आता पुढील आयुष्यातील करियर घडविण्याच्या दृष्टीने मराठी विज्ञान परिषद, डोंबिवली आयोजित करीत आहे एक शिबिर

शिबिरात अनुभवी तज्ज्ञांकडून आरोग्य, व्यक्तिमत्व व कुटुंबस्वास्थ्य, पर्यावरण व समाज, संशोधन व विज्ञान, स्पर्धा परीक्षा, करियर, नोकरी व व्यवसाय याविषयी विविध उपक्रमातून मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

७ ते १० एप्रिल, सकाळी १० ते दुपारी ४

पहिल्या २५ जणांनाच प्रवेश

अधिक माहितीसाठी संपर्क :

श्री. अविनाश देवधर (अध्यक्ष म.वि.प. डोंबिवली विभाग. मोबाईल ९२२४२६४९६९

# आनंदयात्रा

– डॉ. सौ. सुगंधा सुरेश देवधर

नदीचा उगमापासून मुखापर्यंतचा प्रवास व मानवाचा जन्मापासून अंतिम क्षणापर्यंतचा प्रवास यामध्ये मला खूप साम्य जाणवते.

उगमापाशी टिचभर प्रवाह असलेली सरिता निर्झररुपाने निघते. डोंगरदऱ्यातून अवखळपणे नाचत बागडत, उड्या मारीत, गाणी गात प्रवास सुरू करते. उंचसखल भागातून सपाट भूमीवर आल्यावर मात्र तिच्यातील बाल्य संपल्यासारखे भासते. उथळ पाण्याचा खळखळाट मात्र जाणवतो कायम असतो, कारण अजून प्रौढत्व आलेल नसतं. मुख्य प्रवाहात सामील होणाऱ्या अनेक ओढ्यांशी छोट्या नद्यांशी हातमिळवणी करीत ती जशीजशी पुढे जाते तसंतसं तिचं पात्र रुंदावत जातं, तसंच खोलावतही जातं. त्यामुळे पहिला खळखळाट नाहीसा होऊन संथ धीरगंभीर प्रवाह पुढे वाहत जातो. आपली जलसंपदा वाढवीत असतानाच ती परोपकारार्थ धावू लागते. आसपासच्या प्रदेशाला पाणीपुरवठा करीत, तीरावरील लोकांचे पापक्षालन करीत, त्यांची पापे आपल्या पोटात रिचवून त्याला पावन करीत ती आपला प्रवास चालू ठेवते. शेवटी सागरामध्ये विलीन होताना स्वत:चं अस्तित्वच विसरून जाते, सागरच होऊन जाते. अशी ही नदीची आनंदयात्राच नव्हे का?

असंच काहीसं मनुष्यप्राण्याचं, म्हणजेच आपलं होत? बाल्यातील अवखळपणा खोडकरपणा कुमारवयात कमी होतो. विद्यार्जन करणं, स्वत:च व्यक्तिमत्व घडविणं, फुलवंण हेच ध्येय कुमारवयात किशोरवयात समोर असतं. हसत खेळत, बागडत स्वत: आनंद घेणं, आप्तेष्टांना आनंदी करणं, यात तारुण्यात कधी प्रवेश केला हे कळत नाही. विद्यार्जनानंतर अर्थार्जन आलंच. त्याच वेळेस गृहस्थाश्रमातही प्रवेश केलेला असतो. आता आपल्या कुटुंबासाठी आपलं जीवन असतं. कुटुंबाला प्राधान्य देत स्वहित जपतो (अर्थात यात गैर काहीच नाही.) कुटुंबस्वास्थ्य जपणं, त्यांच्या आवश्यक त्या गरजा पुरविणं, वडीलधाऱ्यांची काळजी घेणं, पै पाहुण्यांची सरबराई करणं, ही गृहस्थाश्रमाची कर्तव्यच आहेत. पण या सर्व कर्तव्यातून केव्हातरी बाहेर पडायलाच हवं. त्यात गुंतून पडू नये.

साधारणपणे पन्नास वर्षे पूर्ण केल्यानंतर पूर्वीच्या काळी वानप्रस्थाश्रम स्वीकारत असत. अरण्यामध्ये जाऊन जीवन व्यथित करीत. अध्यात्म व परमार्थ यामधे रस घेत. ही असे सन्यासाश्रमाची पूर्वतयारी. पंचाहत्तर वर्षानंतर संन्यास घेऊन सर्वस्वाचा त्याग करून तीर्थयात्रेला निघून जात परत संसारात न येण्यासाठी.

आजच्या काळाचा विचार केला तर साधारणपणे पन्नास वर्षे पार करतांना आपण गृहस्थाश्रमातील कर्तव्यातून जबाबदारीतून हळूहळू बाहेर पडत असतो. कालानुरूप पूर्वीच्या वर्णाश्रमातील वागणुकीत बदल झाले तरी त्यातील मूळ हेतू ध्यानात घेऊन आपले वर्तन ठेवले तर आपल्या जीवनाचीही आनंद यात्रा होऊ शकेल.

आज पाहिलं तर साठीपर्यंत लोक व्यवसायातून निवृत्त होतात, नव्हे व्हावंच लागतं. संसारातूनही त्यांची कर्त्या पुरूषाच्या भूमिकेची जबाबदारी संपलेली असते. आता मुलं कर्तबगार झालेली असतात. घरात नातवंडांचा किलबिलाट असतो. आतापर्यंत न मिळालेला निवांतपणा लाभलेला असतो. आपले अर्धवट सोडलेले छंद

जोपासण्यासाठी वेळ असतो. आणि या सगळ्यात निरामय आरोग्याची साथ असेल तर आनंदयात्रा करण्यासाठी आणखी काय हवे? तुकोबांच्या शब्दात '' आनंदाचे डोही आनंद तरंग''

पण प्रत्यक्षात काय दिसते? कोणत्याही क्षेत्रातून निवृत्ती स्वीकारणे कठीण जाते. कारण बरेच वेळा ती लादलेली असते. जशी कार्यालयातून मिळालेली निवृत्ती, ती अटळ असते. पण घरातून, संसारातून निवृत्ती कुणी स्वीकारत नाही आणि तिथेच घोटाळा होतो. घरातील मुले आता कर्ती झालेली असतात. आणि वडिलांना आपले कर्तेपण अजून सोडायचे नसते. एकाच म्यानात दोन तलवारी कशा राहणार मग अगदी तलवारीचा खणखणाट नाही तरी धुसफुस चालू होते. हीच गोष्ट स्त्रियांच्या बाबतीत. घरी सुना आलेल्या असतात. नातवंड असतात तरी तिजोरीच्या व स्वयंपाकघराच्या चाव्या त्यांना सोडवत नाहीत.

समजा मुलं बरोबर राहात नसली तरी भौतिक सुखाची आसक्ती कमी होत नाही, अहंपणा आपली पाठ सोडत नाही. वयोमानानुसार आवश्यक असलेली विरक्ती येत नाही. सशंयी वृत्ती कमी होत नाही. हवं हवं हा मंत्र सोडवत नाही. मग आपण आनंदयात्री कसे होणार?

यासाठी मला वाटतं आपण एक वसा घ्यावा! मुलं कर्ती झाल्यावर आईवडिलांनीं स्वेच्छेने आपली कर्तेपणाची भूमिका सोडून पुन्हा बाल्य अनुभवावे. नाहीतरी म्हातारपण म्हणजे दुसरे बालपणच! मग मुलांनाच आपल्या पालकाचे स्थान द्यावे. याचा अर्थ असा नव्हे की आपली जबाबदारी झटकून टाकावी. मुलांना जेव्हा आधाराची गरज असेल तेव्हा आपला हात सदैव पुढे असावा, पण आपली लुडबुड त्यांच्या मधे नसावी. म्हणजेच संसारात राहूनही वानप्रस्थाश्रमाचा हेतू मनात ठेवून आचरण असावे.

नातवंड आपली असली तरी ती आपल्या मुलांची मुलं आहेत हे सदैव लक्षात ठेवावे. मुलांना कसं वाढवावं याच संपूर्ण श्रेय त्यांच्या आईवडिलांचं म्हणजेच आपल्या मुलांच असावं.

आपल्या तारुण्यातील वागणुकीचे, संस्कारांचे सगळे मापदंड आजच्या काळात तसेच लागू होऊ शकत नाहीत हे ध्यानात ठेवले पाहिजे. म्हणजे आमच्या वेळी असं होत आणि आज कस आहे अशी तुलना होणार नाही. तसा विचार केला तर आपल्या आधीची पिढी व आपली पिढी यांच्यातही हा संस्कारांचा फरक होताच ना? आपल्या काळातील सातच्या आत घरात हा मंत्र जसाच्या तसा आज अंमलात आणता येईल का? याचा विचार करावा.

मुलानातवंडाच्या सहवासात आनंदाने जीवन व्यथित करायचे असेल; तर आपली भूमिका गाडीचालकाची नसून आता मागच्या सीटवर बसून आरामात आनंदात प्रवास करणाऱ्याची आहे. पण गरज पडलीच तर वेळप्रसंगी गाडीला धक्का मारण्याची जबाबदारीही आहे हे लक्षात ठेऊन प्रवास सुरू केला तर वानप्रस्थाश्रमातील ही आनंदयात्रा खरोखरच आनंददायी होईल यात शंकाच नाही.

आपले छंद व तब्बेत सांभाळावी. समविचारी समवयस्क लोकांमध्ये मित्रांमध्ये वेळ घालवावा. आत्मपरीक्षण कराणे, सकारात्मक विचारसारणी असावी, आनंद द्यावा आनंद घ्यावा! एकमेका साहाय्य करू अवघे धरू सुपंथ!

***

# वृद्धाश्रमांना लोकांच्या पैशांपेक्षा त्यांचा वेळ हवा आहे

- डॉ. दिलिप देवधर

सूतिका सेवा मंदिर रुग्णालय आणि सहजीवन वृद्धाश्रमाचे विश्वस्त डॉ. दिलिप देवधर यांची मुलाखत

** वृद्धाश्रम सुरू करण्याचा विचार कसा आला?*

- मी नेहमी फॅमिली फिजिशियन म्हणून काम केलं. गेल्या दीड दशकांपाहून मी पाहतो आहे की, एकत्र कुटुंबपद्धती जाऊन स्वतंत्र राहण्याची पद्धती आल्याने अनेकदा ज्येष्ठांची व्यवस्थित काळजी घेतलीच जात नाही. कुटुंबात सदस्यांची संख्या कमी असते. महिलादेखील नोकरी करतात. त्यामुळे ज्येष्ठांची काळजी घेण्यासाठी घरात कोणीच नसतं. मुले बाहेरगावी किंवा परदेशात असली तर घरात वृद्ध पती-पत्नी एकटेच राहत असतात. त्यांची काळजी घेण्यासाठी कोणाची नेमणूक केली तर त्या व्यक्तीला दरमहा पाच ते दहा हजार रुपये द्यावे लागतात. हे सगळ्यांनाच शक्य होत नाही. त्यामुळे आपण अत्यंत किफायतशीर दरात वृद्धाश्रम सुरू करावा आणि ज्येष्ठांची काळजी घ्यावी, असं मला वाटलं. वैद्यकीय क्षेत्राची पार्श्वभूमी असल्याने हे करणं माझ्यासाठी सहज शक्य होतं. २००८ मध्ये मी 'सहजीवन' वृद्धाश्रमाची सुरुवात केली. नारायण पेठेत तीन मजली इमारत विकत घेतली आणि ३० वृद्धांची क्षमता असलेला वृद्धाश्रम सुरू केला.

** सुरुवातीला किती वृद्ध राहायला आले? आता किती वृद्ध राहतात? तुमची फी किती आहे?*

- सुरुवातीला एक मजला सुरू केला होता. तेव्हा ८ वृद्ध राहत होते. माऊथ-टू-माऊथ पब्लिसिटी होत गेली. त्यामुळे आम्ही उरलेले दोन मजलेही सुरू केले. नंतर आम्ही भूगावला १० हजार चौ. फुटांची इमारत बांधली. तिथे ५० वृद्धांची सोय होऊ शकते. नारायण पेठेतल्या आमच्या वृद्धाश्रमात ८५ वर्षाच्या वरचे लोक आहेत. त्यांपैकी काही तर अंथरुणावर आहेत. त्यांची खूप काळजी घ्यावी लागते. दोन्ही वृद्धाश्रमांमध्ये तीन पाळ्यांमध्ये आमचे कर्मचारी कार्यरत असतात. नारायण पेठेत दरमहा ८००० रुपये तर भूगावला ९००० रुपये फी आहे. ज्या लोकांची आर्थिक परिस्थिती नसते त्यांना आम्ही सूट देतो. या फीमध्ये निवासव्यवस्थेसोबत नास्ता, दुपारचं- रात्रीचं जेवण, दिवसातून दोन वेळा चहा आणि औषधोपचार यांचा समावेश आहे. नारायण पेठेत आठवड्यातून पाच दिवस तर भूगावला दोन दिवस मी स्वत: सगळ्यांची तपासणी करतो. जर कोणाला बाहेरून औषधे मागवावी लागत असतील तरच त्याचे वेगळे पैसे. आम्ही पीडियाट्रिक ओपीडीपण चालवतो.

** वृद्धाश्रमात राहणाऱ्या वृद्धांशी त्यांच्या घरच्यांशी वागणूक कशी असते?*

- घरच्यांची वागणूक चांगली असते. ज्यांचे कुटुंबिय गावातच राहतात. ते आठवड्यातून एकदा तर ज्यांचे कुटुंबिय बाहेरगावी असतात ते महिन्यातून एकदा भेटायला येतात. प्रत्येक वेळी मुले मुद्दामच आई-वडिलांना घराबाहेर काढतात आणि वृद्धाश्रमात ठेवतात, असं नाही. अनेकदा नाईलाज असतो. लोक १-२ वर्षे प्रयत्न करून पाहतात जेव्हा त्यांना जमणार नाही असं वाटंत तेव्हाच ते वृद्धाश्रमात आणून सोडतात. उच्च मध्यम वर्ग आणि श्रीमंत मंडळींकडे पैसा असतो. त्यांची घरे मोठी असतात. त्यामुळे घरातच कोणीतरी देखभालीसाठी ठेवणं त्यांना शक्य असतं. मात्र मध्यमवर्गीयांना ते शक्य होत नाही. अनेक वृद्ध शारीरिकदृष्ट्या परावलंबी असतात किंवा काहींना मानसिक आजार असतात. अशा वेळी त्यांना सांभाळणं घरच्यांना शक्य होत नाही. आम्ही त्यांची विशेष काळजी घेतो. त्यामुळेच मी स्वत: आई-वडिलांना वृद्धाश्रमात ठेवणं चुकीचं मानत नाही. आणि आजच्या तरुण पिढीला दोषही देत नाही. त्यांचाही नाईलाज असतो. करिअरसाठी त्यांना बाहेर जावं लागतं. मात्र, त्यांना आपल्या आई-बाबांची देखभाल करायलाही कोणीतरी हवं असतं. म्हणून ते आई-वडिलांना वृद्धाश्रमात ठेवत असतील तर त्यात काहीच चूक नाही. याउलट काही लोक असेही असतात, जे आपल्या आई-वडिलांना सोडून जातात. नंतर त्यांना विचारत नाही,

त्यांची फी भरत नाही. आम्ही मात्र अशा लोकांना काहीही म्हणत नाही. अर्थात, असे एक-दोन लोकच आहेत. घरातून वृद्धाश्रमात आणून सोडा जिथे ते सन्मानाने जगू शकतील.

** तुम्हाला बाहेरून निधी येतो का?*

- आम्ही शासनाकडून कोणत्याही प्रकारचा निधी घेत नाही, आणि यापुढेही घेणार नाही असं आम्ही ठरवलं आहे. कारण ती प्रक्रिया करण्यात खूप वेळ वाया जातो. तसंच शासनाचे लोक नंतर उगीच ढवळाढवळसुद्धा करतात.आम्हाला हे काहीही नको असल्याने आम्ही शासनाकडून निधी घेत नाही. कोणी स्वत: येऊन देणगी दिली तर ती आम्ही घेतो. लोक वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस किंवा अजून कुठल्या निमित्ताने येतात आणि देणगी देतात. खरंतर या वृद्धांना लोकांच्या पैशांपेक्षा त्यांचा वेळ हवा आहे. कोणी येऊन त्यांच्याशी फक्त गप्पा मारल्या तरी त्यांना खूप बरं वाटतं. त्यामुळे लोकांनी या वृद्धांसोबत काही वेळ घालवावा, असं आम्ही त्यांना आव्हान करतो. अनेक वृद्धांना वाचायचं असतं पण त्यांना दिसत नाही. त्यांना तुम्ही वाचून दाखवलं तर त्यांना खूप आनंद होतो.

** समाजातील वृद्धाश्रमांची वाढती संख्या आपल्या संस्कृतीच्या दृष्टीने योग्य नाही, असं म्हणतात. तुम्हाला काय वाटतं?*

- लोक देखभाल करू शकत नाही किंवा वेळ नाही म्हणून जर लहान मुलांना पाळणाघरात ठेवत असतील तर त्याच कारणांमुळे वृद्धांना वृद्धाश्रमात ठेवलं तर त्यात चुकीचं काय? बालपण आणि वृद्धावस्था यांत जास्त फरक नसतो. येणाऱ्या काळात वृद्धाश्रमांची संख्या अजून वाढेल. काही लोक या क्षेत्राला व्यवसाय करू पाहात आहेत. जे अत्यंत चुकीचे आहे. शासनाने यासंबंधी काही नियम तयार करायला हवेत. कारण घरात कोणीतरी ठेवून त्याच्या जिवावर वृद्धांना सोडणं तितकसं सुरक्षित होऊ शकत नाही. अशा वेळी वृद्धाश्रम हाच उत्तम पर्याय ठरतो.

** वृद्धांमुळे काही समस्या निर्माण होतात का?*

- कधीकधी काही गोष्टींचा त्रास होतो. नारायण पेठेत ८५ वर्षावरील वृद्ध आहेत. त्यांच्यापैकी काहींना शारीरिक व्याधींबरोबरच अल्झायमरसारखे मानसिक आजारही आहेत. त्यामुळे अनेकदा त्यांचा स्वत:वर ताबा राहत नाही. ते हिंसक सोतात. अनेकदा वृद्धांनी आमच्या कर्मचाऱ्यांना मारलं देखील आहे. मात्र असं खूप कमी वेळा होतं. आम्ही मनोरुग्णांना ठेवत नाही. या व्यतिरिक्त कोणत्याही विशेष अशा समस्या नसतात.

प्रश्न - तुमची विस्तार करण्याची काही योजना आहे का?

- हो. भूगावमध्ये आम्हाला १० लोकांची क्षमता वाढवायची आहे. तसंच अप्पा बळवंत चौकात नुकताच आम्ही एक हॉल घेतला आहे. तिथे आम्ही एक इन्स्टिट्यूट सुरू करत आहोत. त्याद्वारे आम्ही आराग्य शिक्षण, तणावमुक्त जीवन, संगीतमय उपचार, समुपदेशन यांसारखे काही प्रमाणात अभ्यासक्रम अत्यंत किफायतशीर दरात सुरू करणार आहोत.

** तुमचं स्वप्न काय आहे?*

- खास वृद्ध व्यक्तींसाठी एखादी टाउनशीप तयार व्हावी असं मला वाटत. या आधी शहरात असे १-२ प्रयत्न झाले आहेत. माझअयाकडे याविषयीचं अतिशय उत्तम नियोजन आणि संशोधन आहे. कोणाला असा प्रकल्प राबवायचा असेल तर मी नक्कीच सहकार्य करेन.

*(संध्यानंद शुक्रवार दि. १६ फेब्रुवारीमधून साभार)*

देवधर - दीक्षित - ढमढेरे कुलबंधु-भगिनींची माहिती असलेल्या कुलवृत्तांताची नवीन प्रत काढायचे आहे. त्यासाठी ज्या क्रमाने माहिती पाठवायची आहे तसा नमुना फॉर्म गेल्या अनेक अंकात आपण छापत आहोत. या वेळी जरी तो नमुना आपण छापलेला नसला तरी तो आपल्याकडे असेलच. नसल्यास आपल्या वेबसाईटवर गेल्या वेळचा अंक आहे. त्यावरून ज्यांनी अद्याप माहिती पाठविलेली नाही त्यांनी लवकरात लवकर पाठवावी असे पुन्हा एकदा आवाहन करीत आहोत.

कुलवृत्तंत तयार व्हावा ही आपल्या सर्वांची गरज आहे. ती जबाबदारी फक्त कार्यकारिणीने घेतली आहे इतकेच. धन्यवाद!

-संपादक